# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०—२५६०१२२३
०२०—२५६०१३५३
०२०—२५६०१२६३

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
ई—मेल
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:आयक्यूएसी / 785

दि :— 11/10/2019

प्रति,
मा.प्राचार्य,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व
नॉन—एआयसीटीई अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय — शैक्षणिक वर्ष २०१९—२० साठी माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरणेबाबत.

संदर्भ — मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे —१ यांचे पत्र क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१९—२०/१३६४२, दि.०९/१०/२०१९.

महोदय/महोदया,

आपणांस विदितच आहे की, राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सांख्यिकीय माहितीची अत्यंत आवश्यकता असते. सदरची माहिती विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून संकलित करण्यात येते.

प्रस्तुत विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८—१९ ची माहिती, व्यवस्थापन प्रणालीची (M.I.S.) १००% माहिती वेब पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना उपलब्ध करून दिलेली आहे. सदरची माहिती सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांनी वेळेत उपलब्ध करून दिल्याने आपण माहिती व्यवस्थापन प्रणालीचे काम यशस्वीपणे पूर्ण करू शकलो याबद्दल आपल्या सर्वांचे आभार !

शैक्षणिक वर्ष २०१९—२० ची माहिती, व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने भरण्याची लिंक सुरू झालेली असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयामधील तसेच दादरा—नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र व इतर नॉन एआयसीटीई अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांकडून ऑनलाईन पध्दतीने विविध विवरणपत्रामध्ये माहिती मागविण्यात येत आहे.

(अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र इत्यादी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांना माहिती व्यवस्थापन प्रणाली लागू नाही)

**माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरताना फक्त Internet Explorer हे browser वापरावे व त्याचे Version 8.0 & above असायला हवे. त्यामुळे याच browser चा वापर करावा. इतर browser चा वापर करू नये, अन्यथा भरलेली माहिती Save होणार नाही, याची सर्व संबंधित महाविद्यालयांनी कृपया नोंद घ्यावी.**

तसेच, पुढे नमूद करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरल्यानंतर विद्यापीठाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी/अनुदान प्राप्तीसाठी विद्यापीठाकडून ना–हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. महाविद्यालये/परिसंस्थांची कामे जलदगतीने होण्यासाठी, शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून सदरचे ना–हरकत प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू करण्यात आलेली आहे. त्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.

www.unipune.ac.in – BOD online - Login - for College Users - College Login ID - Password - NoC Details - Fill M.I.S. information - Select Nodal Officer or Teacher Name - Submit - Print NoC Format on College Letter Head. (The necessary documents to be attach) 1. Upload NoC format with Principal/Director's Sign and stamp 2. Upload M.I.S. Progress report.

सदरची माहिती शासनास अत्यावश्यक असून संबंधित महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने विहित विवरणपत्रांमध्ये दि. १५ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण माहिती भरणे आवश्यक असून त्वरित ऑनलाईन माहिती भरून सहकार्य करावे.

याबाबत महाविद्यालयांना काही अडचणी उद्भवल्यास, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक ०२०–६५००१०१६, ६५००११७३, तसेच अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ येथील ०२०–२५६०१२२३, २५६०१३५३ यांचेशी संपर्क साधावा किंवा naac@unipune.ac.in यावर ई–मेल करावा.

आपला,

(मुं.वि.रासवे)
उपकुलसचिव
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)